# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  84/2023          दिनांक : 22.02.2023

## 1)जबरी चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 21.02.2023 रोजी चे 05.00 वा. चे सुमारास, **दिवज गोरक्षण वाजेगाव ता. जि. नांदेड येथे,** फिर्यादी हा गोरक्षण येथे जात असतांना ॲटोमध्ये बसुन  देगलुर नाका कमानीजवळ उतरून रस्त्याने गोरक्षण दर्शनासाठी गेले असता अनोळखी इसम त्यांचे वय अंदाजे 25 ते 30 वयोगटाचे फिर्यादी जवळ आले व  त्यांतील एकाने मला पाठीमागुन पकडले व म्हाणाले कि तु ईकडे कशाला आला आहेस असे म्हणुन मला थापडा बुक्याने मारहाण करून फिर्यादी ओरडला असता त्यातील एकाने फिर्यादीचे तोंड दाबुन त्यास खाली पाडुन त्याचेसोबत झटापटी करून त्यांचे जवळील 1) ओपो कंपनीचा मोबाईल किंमती 15,000/–रूपयाचा व 2) विवो कंपनीचा मोबाईल किंमती 5000/– रूपये  3) पर्स मधील नगदी 800/– रूपये असा एकुण 20,800/–रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी सैगमुनी नरेंद्रमुनी अंकुळनेकर, वय 46 वर्षे, व्यवसाय  भिक्षुकी रा. कमलापुरा  ता. श्रीरामपुर  जि.  अहमदपुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 110/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ श्री. आनंद बिचेवार मो.क्रं.  9561038001** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**1)लिंबगाव** :– दिनांक 20.02.2023 चे रात्री 23.00 वा ते दिनांक 21.02.2023 चे 08.00 वा. चे दरम्यान, **अदित्य सिटी कॅनल रोड बालाजी मंदीर जवळ पुयनी शिवार जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादी व त्याची पत्नी असे घराला कुलूप लावुन शिखर शिंगणापुर येथे देव दर्शनासाठी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयानी फिर्यादीचे घराचा मुख्य लोंखडी व लाकडी दरवाज्याचे कडी कोंडा कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील वरच्या मजल्यावर असलेल्या बेडरूम मधील लोंखडी कपाटाचे चाबीने कुलुप काढुन 1)दोन तोळयाचे ब्रासलेट किंमती 70,000/–रूपये 2) दोन सोन्याचे ऐड अंगठी प्रत्येकी पाच ग्रॅम एकुण एक तोळयाची किंमती 40,000 रूपये 3) एक महाराज्या सोन्याची अंगठी पाच ग्रम वजनाची किंमती 20,000/– रूपये असा एकूण 1,30,000/– रु. चा ऐवज चोरुन नेला आहे. वगैरे  **फिर्यादी रामकिशन गंगाधर पालीकर वय 52 वर्षे, व्यवसाय  नौकरी रा.  अदित्य सिटी कॅनल रोड बालाजी मंदीरा जवळ पुयनी शिवार  लिंबगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरन 24/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि  /केजगीर मो.क्रं  8830763211** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)भोकर** :– दिनांक 20.02.2023 रोजी चे 09.30 ते 10.00 वा. चे दरम्यान,  **ओम भोजनालय भोकर समोर ता.भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलेन्डर प्लस मो सा क्रमांक एमएच–26/बीटी–8401 किंमती  60,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी विनोद गणेश बुदेवाड, वय 30 वर्षे, रा. जाकापुर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 58/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/ श्री. जाधव  मो. क्रं.  8605430645**  हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 21.02.2023 रोजी चे 00.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे किराणा दुकाना समोर विजयनगर के–2 सिडको नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून किराणा दुकानातील सिगारेट व सामान पैसे न देता घेवुन जावु का असे म्हणले असता फिर्यादीने देत नाही म्हणल्याचे कारणावरून फिर्यादीचे किराणा दुकानाच्या खिडकीवर व घराच्या दरवाज्यावर दगड मारून बाहेर ठेवलेली सिमेंटच्या पाण्याची टाकी व कुलर फोडुन नुकसान केले व बाहेर येवुन फिर्यादीने विचारणा केली असता यातील आरोपीतांनी शिवीगाळ करून आरोपीतांनी हातात दगड घेवुन फिर्यादीचे उजव्या डोळयाच्या वर डोक्यात मारून डोके फोडुन गंभीर जखमी केले व फिर्यादीचा मुलगा सोडवण्यास आला असता आरोपीने लोखंडी रॉडने त्याच्या उजव्या हाताच्या बोटावर मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सुभाष कोंडीबा मुक्कावार, वय 65 वर्षे, व्यसवसाय मजुरी रा. विजयनगर के–2 सिडको नांदेड,** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 109/2023 कलम 326, 504, 506, 427, 34 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो. नं. 9823333377**  हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 21.02.2023 रोजी 07.45 ते 08.00 वा. चे दरम्यान, **आसना ब्रिजजवळील गुरूध्दारा समोरील अर्धापुर ते नांदेड रोडवर मौ. पिंपळगाव शिवारात ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील मयत नामे **पोकॉ/मोहनराव मारोती पवळे, वय 42 वर्षे, रा. कुरूळा ने. जितुंर पोलीस स्टेशन जि. परभणी,** हा वॉकींग करून ॲक्टीव्हा स्कुटी क्रमांक एमएच–26/सीबी–6655 ही वर बसुन अर्धापुर ते नांदेड असे परत येत असतांना आसना ब्रिज जवळील गुरूध्दारा समोर रोडवर आला असता यातील टाटा कंपणीचा 407 टेम्पो क्रमांक एमएच–10/झेड–5296 चे चालकाने त्याच्या ताब्यातील विटानी भरलेले वाहन हे हयगय व निष्काळजीपणाणे भरधाव वेगात चालवुन मयताचे स्कुटीला जोराची धडक देवुन गंभीर दुखापत करून त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी सुनिल मारोतीराव पवळे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. मु. पो. कुरूळा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 50/2023 कलम 279, 304(अ), 427 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुरवसे, मो.नं. 9766105366** हे करीत आहेत.

## 6)ई सी ॲक्ट :–

**1)विमानतळ :–** दिनांक 17.02.2023 रोजी चे 23.45 ते दि. 18.02.2023 चे 01.45 वा. चे दरम्यान, **मौ. ब्राम्हणवाडा ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी मौ. ब्राम्हणवाडा नांदेड येथील स्वत धान्य दुकान मधील शासनाकडुन गोर गरीबांना वितरीत केला जाणारा तांदुळ 12 कट्टे किंमती 18,000/–रूपयाचा माल काळया बाजारात चोरटी विक्री करण्यासाठी शासनाकडुन शासनमान्य दुकानातुन बाहेर काढुन वाहन क्रमांक एमएच–02/सी ई–4779 मध्ये भरून नेत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी दिपक पार्श्वनाथ मरळे, वय 50 वर्षे, व्यवसाय नौकरी नायब तहसीलदार पुरवठा तहसिल कार्यालय नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 62/2023 कलम 3, 7 ई सी ॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जाधव, मो.नं. 9765902710** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**1)धर्माबाद :–** दिनांक 20.02.2023 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **रेल्वे गेट नंबर दोन रत्नाळी रोड धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 2160/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2177 सुभाष बाबाराव मंगल, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 36/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कारामुंगे, मो.नं. 9021961607** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड